REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# छत्रपती संभाजी महाराज व औरंगजेब पुत्र अकबर यांच्यातील संबंध

प्रा.डॉ.राजेंद्र गायकवाड
इतिहास विभाग प्रमुख, विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी
ता.माढा, जि.सोलापूर.

## प्रस्तावना :

छत्रपती संभाजीराजांच्या राज्याभिषेकानंतर हिंदूस्तानच्या राजकीय पटलावर घडामोर्डींना ऊत आला होता. मोगल बादशाह औरंगजेबाने रजपूत राजा जसवंतसिंगाच्या मृत्यूनंतर, रजपूतांच्या राज्याचा घास घेण्यासाठी राजपुत्र अकबराची नेमणूक राजस्थानच्या मोहिमेवर केली. या मोहिमेत तो सपशेल अपयशी ठरला होता. राजपुत्र महत्त्वाकांक्षी होता. बादशहाच्या मरणाची वाट पाहत बसण्यापेक्षा बंडखोरी करावी या हेतूने त्याने रजपूत सरदार दुर्गादास राठोडच्या सहकार्याने दिल्लीची गादी बळकावण्याचे ठरविले. या कामी त्याला रजपूतांनी सहकार्याचे आश्वासन दिले होते. औरंगजेबाच्या कानी बातमी जाताच राजपुत्र आणि रजपूत यांच्यातील मैत्री तोडण्यासाठी त्याने डावपेच आखण्यास सुरूवात केली. औरंगजेबाने द्विअर्थाचा पत्रव्यवहार करून अकबराला रजपूताच्या गोटातून बाहेर काढण्यात यश मिळवले. पत्रामधील मजकूरान्वये रजपूतांना असे भासवले की, आपणच अकबराला रजपूतांच्या गोटात पाठविले आहे. रजपूतांनी अकबराची साथ सोडली. अकबर असाहाय्य झाला. कोणाचे सहकार्य घ्यावे त्याला सूचेना. औरंगजेबाची कुकिर्ती एवढी होती की, उभ्या हिंदूस्थानात त्याला टक्कर देणारी एकही सत्ता अस्तित्वात नव्हती. दुर्गादास राठोडने अकबरला दक्षिणेतील मराठी सत्तेचा छत्रपती संभाजी महाराजांचे सहाय्य घेण्याचे सूचविले. अकबराने संभाजीराजांशी पत्रव्यवहार करून आश्रय देण्याची विनंती केली. संभाजीराजे माणसांची पारख चांगल्याप्रकारे करू शकत होते. त्यांनी अकबराला आश्रय देऊन औरंगजेबाच्या आक्रमणाची कुऱ्हाड स्वराज्यावर कोसळवून का घेतली हे एक कोडेच आहे. बरे आश्रय दिला म्हणूनच औरंगजेब मराठी सत्तेवर चालून आला असे नाही. तो स्वराज्यावर कधी ना कधी चालून येणारच होता. अकबराच्या बंडखोरीने ही वेळ लवकर आली. संभाजी राजे मोगली राजपुत्राला सहजासहजी आश्रय द्यायला तयार नव्हते. तरीही माहोली किल्ल्यास लागून असलेल्या सुधागड (पाली) येथे अकबराच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली.[१] संभाजीराजांनी अकबराचा खरा उद्देश जाणून घेण्यासाठी, त्याची भेट घेण्यास विलंब लावला. राजे अकबराची परीक्षा घेत होते. संभाजीराजे अकबराची भेट घेण्यासाठी दि. १३ नोव्हेंबर १६८१ रोजी पालीस गेले. दोघांनी हिंदूस्थानच्या राजकीय स्थित्यंतरावर बरीच चर्चा केली असणार. दोघांच्याही जीवनामधील बऱ्याच घटना सुदैवाने एकसारख्याच होत्या.

अकबराच्या बंडाने हैराण झालेल्या औरंगजेबाने लगोलग रजपूतांशी तह केला. अकबराला कैद करणे आणि मराठी सत्तेचा नाश करणे याप्रमुख हेतूने औरंगजेब ८ सप्टेंबर १६८१ रोजी अजमेरहून निघाला. १३ नोव्हेंबर १६८१ ला तो बुऱ्हाणपूरला पोहचला. यापूर्वीच आपला मुलगा आज्जम याची दक्षिणेचा सुभेदार पदी नेमणूक केली होती. औरंगजेबाने आपल्या सोबत आपली मुअज्जम, कामबक्ष ही मुले, शहजादा मुइजुद्दीन हा नातू व शहाबुद्दीन ऊर्फ गाजीउद्दीन फिरोजजंग, बक्षी रूहुल्लाखान, हसनअलीखान, रणमस्तखान पन्नी, बहादूरखान, राव दलपतराय, लुत्फुल्लाखान इ. सरदार, त्याचबरोबर ३ ते ४ लाखाचे घोडदळ व ४ लाख पायदळाचा प्रचंड मोठा सेनासागर घेऊन औरंगजेब दक्षिणेमध्ये उतरला होता.

संभाजीराजांचा विश्वास संपादन करण्यात अकबर यशस्वी झाला. अकबराला आश्रय देताना एक मोठा मनसुबा संभाजीराजांच्या मनात होता. औरंगजेबाचे आक्रमण थोपविण्यासाठी रजपूतांचे सहकार्य मिळविण्यासाठी त्यांनी अंबरचा (जयपूरचा) राजा रामसिंग याला खरमरीत पत्र लिहून आपल्या मनातील मनसूबा स्पष्ट केला. त्या पत्रातील मजकूर खालीलप्रमाणे :-

“त्या यवनधामाला (औरंगजेबाला) सांप्रत असे वाटू लागले आहे की आम्ही हिंदू तत्वशून्य झालो आहोत. आम्हाला धर्माचा काहीही अभिमान राहिलेला नाही. बादशहाची वागणूक यापुढे आम्हाला सहन होणार नाही. आम्ही क्षत्रिय आहोत. आमच्या धर्माला कमीपणा आणणारी कोणतीही गोष्ट आम्ही मान्य करणार नाही. वेद, श्रुती-स्मृती इत्यादींना धर्म आणि जाती यांच्या संबंधीची कर्तव्ये नेमून दिलेली आहेत. त्यांची पायमल्ली झालेली आम्हाला सहन होणार नाही. राजे म्हणून प्रजापालनाचा आमचा जो धर्म आहे तो आम्ही टाकू शकत नाही. या दुष्ट यवनांशी युद्ध करण्यात आम्ही आमची संपत्ती, आमचा देश, आमचे दुर्ग, सारांश सर्व काही पणास लावावयास तयार आहोत. या दृढ उद्देशाने आम्ही गेली दोन वर्षे अकबर आणि दुर्गादास राठोड यांना आमच्या देशात आश्रय दिला आहे. आम्ही यवनाधिपतीच्या अनेक सेनानायकांचा वध केला आहे, कित्येकांना कारागृहात टाकले, काहींना खंडणी घेऊन तर काहींना दयाबुद्धीने सोडून दिले. काहींना लाच चारून आपली सुटका करून घेतली.

अशा रीतीने बादशहाचे सेनानायक हे बिनकामाचे ठरले. आता अशी वेळ आली आहे की या यवनधामाला (औरंगजेबाला) पकडून कारागृहात घालणे शक्य होईल. मग आपल्या देवतांची पुन्हा स्थापना करून धर्मकर्मे निर्विघ्नपणे पार पडतील अशी व्यवस्था करता येईल. हे सारे लवकर करावयाचे आम्ही ठरविले आहे याची आपण खात्री बाळगावी.

इकडे आम्ही अकबर आणि दुर्गादास यांना गुजराथेत पाठविण्याच्या विचारात आहोत. यावेळी आपणही जे काही शक्य आणि आवश्यक आहे ते धैर्याने करावे. पठाणाधिपती (इराणचा) शहा आब्बास याने आपण अकबराला सहाय्य करू असे लिहिले आहे. परंतू या बाबतीत आपण यवनांची मदत घ्यावी आणि यशाचे श्रेय त्यांना मिळवून द्यावे हे मला अनुचित वाटते. आपले पिते (राजा जयसिंग) यांनी यवनधामाला दिल्लीश्वर करून त्याचे श्रेय संपादन केलेच ना? त्याप्रमाणे आपणही अकबराला मदत करून यशाचे धनी व्हावे. यवनांच्या मदतीने अकबराला राज्यपद लाभले तर त्यांना प्राधान्य येईल. ही गोष्ट आपण घडू देऊ नये. आपण उभायतांनी एक होऊन अकबराला गादीवर बसविले तर धर्मरक्षणाचे कार्य होईल आणि आपल्या या कार्याने महाराजा जयसिंग यांच्या वंशाला शोभा येईल.”[२]

रामसिंगाला लिहिलेल्या वरील पत्रातील मजकूरावरून संभाजी राजांनी आपला मनसूबा रामसिंगासमोर ठेवला होता. त्याचवेळी परकीयांनी अकबराला मदत करून आपण पुरूषार्थ दाखविल्यास आपल्याला काही अर्थ उरणार नाही. अकबराला गादीवर बसवण्याची आलेली संधी आपण हातची जाऊ देऊ नये असे संभाजीराजांना वाटते. विनाकारण परकीयांना हिंदूस्तानच्या राजकारणात हस्तक्षेप करू देऊ नये असे संभाजीराजांना वाटते. पण मोगलांची चाकरी करण्याची सवय लागलेल्या रतपूतांनी संभाजीराजांच्या पत्राला योग्य प्रतिसाद दिला नाही. संभाजीराजांनी अकबराचा मामला एकटयानेच मिटविण्याचे ठरवले. संभाजी राजांनी इ. स. १६८१ ते इ. स. १६८५ दरम्यान अकबराला मदत करण्यापेक्षा औरंगजेबाच्या कहरापासून स्वराज्याचे रक्षण करण्याचे ध्येय ठेवले होते. यात संभाजीराजांचा मुत्सद्दीपणा होता. अकबराचे वर्तन संभाजी राजांना आवडत नव्हते. तो स्वत: हिंदूस्थानचा बादशहा झाल्याच्या फुशारकीत वागत होता. संभाजीराजांनी अकबराला मैत्री खातिर एक पोवळयाची माळ भेट दिली होती तर, या नादान राजपुत्राने तो कंठा आपल्या रखेलीला भेट दिला. ही बातमी संभाजीराजांच्या कानी जाताच ज्याला मैत्रीची कदर नाही अशा नादान व्यक्तीला काय सहकार्य करावयाचे अशी महाराजांची समजूत झाली असणार. संभाजीराजांनी दूर्लक्ष करताच तो गोव्याला पोर्तुगीजांच्या आश्रयाला गेला परंतू पदरी निराशा घेऊन तो उलटया पावलांनी संभाजीराजाकडे परतला. संभाजीराजांनी अकबराला कोणतीही मोठी जबाबदारी सांगितली नाही. राजे पोर्तुगीजांबरोबरच्या युद्धात गुंतलेले असल्याने अकबराची सरबराई करण्याची उसंत बहुधा त्यांना मिळाला नाही. अकबराचे पोतुगीजांबरोबर चांगले संबंध असल्याने राजांनी त्याला मराठे - पोर्तुगीज तहाच्या वेळी मध्यस्थ्याची भूमिका बजावण्यास सांगितले. संभाजी राजांचा हा  धोरणीपणा होता. अकबराला आपल्या भवितव्याविषयी शाश्वती वाटेनासी झाली होती. मोगलांच्या आक्रमणामुळे आपणही बादशहाच्या हातात पडू ही भीती त्याला सतावू लागली. त्याने दुर्गादासाच्या मदतीने दोन जहाजे विकत घेतली आणि राजापूरच्या बंदरातून इ. स. १६८७ च्या फेब्रुवारीत इराणकडे रवाना झाला. त्याजबरोबर ५० माणसे होती. दुर्गादास राठोडाने त्यास रवाना केल्यानंतर तो स्वत: रतलामच्या बाजूस गेला. इराणला पोचल्यावर शहाअब्बासचा मुलगा शहासुलतान याने त्याचे स्वागत केले. त्याला पुष्कळ नजराणे दिले. तो तिथेच इ. स. १७०४ साली वयाच्या ४७ व्या वर्षी मरण पावला.[३]

ज्या बंडखोर राजपुत्राला दंड करण्यासाठी औरंगजेब दक्षिणेत उतरला होता तो मरणाच्या भीतीने इराणला पळून गेला. तरीही औरंगजेब उत्तरेकडे परतला नाही. मराठी सत्तेवर विजय मिळवायचा होता. औरंगजेब पाताळयंत्री माणूस होता. त्याने राजपुत्राच्या बंडखोरीतून आपल्या तरूणपणाची आठवण झाली असावी कारण त्यानेही आपल्या पित्याच्या विरूद्ध असेच बंड केले होते. त्यामुळेच तो बादशहा झाला होता. अकबराच्या बंडात बादशहाला आपला भूतकाळ आठवला असणार हे नक्की. छत्रपती संभाजी राजांनीही अकबराला आश्रय देताना भविष्यातील औरंगजेबाच्या आक्रमणाचाही विचार केला होता. शिवाय मोगलशाहीशी दोन हात करताना राजपुत्र अकबराचा आपल्या राजकारणासाठी काही उपयोग होवू शकेल यातून ही मैत्री केली होती. परंतू सर्व बेत तडीस गेले नाहीत हे सत्य.

**संदर्भ :**

१. डॉ. गोखले कमल, शिवपुत्र संभाजी, २००१, पृ. ९८.

२. डॉ. गोखले, तत्रैव, पृ; १०५.

३. वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड भाग-१, शिवकाळ, पृ; २२८.